# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी -१८

(नागरी व प्रशासकीय सेवेसाठी आयएसओ 9001:2008 प्रमाणपत्र प्राप्त संस्था)

## झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग

२०५ व्यापारी संकुल, भाजी मंडई शेजारी चिंचवडगाव पुणे-४११०३३.

Email – slum@pcmcindia.gov.in Website – www.pcmcindia.gov.in

दूरध्वनी क्र. ०२०-२७३५००१३


---

## जाहीर प्रकटन

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी, पुणे-१८, हे पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या से.नं.१७ व १९ चिखली येथील जागेवर आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी घरकुल योजना राबविण्यात येत आहे. सदरच्या योजनेमध्ये दि.२३/८/२०११ रोजी झालेल्या संगणकिय सोडतीमधील प्रतिक्षा यादीमध्ये असलेल्या प्रवर्गनिहाय ८६४ लाभार्थींना घरकुल योजनेमध्ये स्वहिस्सा र.रू ५०,०००/- भरणेकामी पत्र देण्यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग, २०५ व्यापारी संकुल, भाजी मंडई शेजारी चिंचवडगाव पुणे-३३ या कार्यालयाबाहेर सदर लाभार्थींची प्रवर्गनिहाय अर्ज क्रं., प्रतिक्षा क्रं. व नावासहित यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तरी संबंधित लाभार्थ्यांनी या विभागाशी संपर्क साधुन दि. ०९/०४/२०१८ ते दि.०९/०६/२०१८ या कालावधीत आपले पत्र घेवुन जावे व त्यानुसार पुढील कार्यवाही करावी.

तसेच सदरच्या प्रतिक्षा यादीबाबत कोणाची काही हरकत/आक्षेप असेल तर संबंधितांनी लेखीपुराव्यासह यादी प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाच्या आत सादर करावेत. मुदतीत हरकत/आक्षेप सादर न झालेस सदरची प्रतिक्षा यादी कायम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि. ७/०४/२०१८

जाहीरात क्र.१२१७

सही/-

सक्षम प्राधिकारी

तथा

सहा. आयुक्त

झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी१८

सदरचे जाहिर प्रकटन दि.9/4/2018 रोजीच्या दैनिक सकाळ या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करणेत आले आहे.